लोकमत शनिवार, दि. २९ सप्टेंबर २००७

# फोनवरून हृदयाच्या ठोक्यांचा ठाव घेणारी टेलिईसीजी यंत्रणा

■ संध्या कुटे

**ठाणे, दि. २९** -'दिल है छोटा सा छोटी सी आशा' या गाण्यासारखे आपले हृदय खरेच खूप छोटेसे आहे. या छोट्याशा हृदयावर आजच्या धावपळीच्या जीवनातला वाढणारा ताणतणाव, बदलणारी जीवनपद्धती आणि आहारातील बदल यामुळे हृदयविकाराचे प्रमाण खूप वाढत आहे. या विकारात तात्काळ ई.सी.जी. आणि त्यानुसार पुढील उपचार रुग्णाला मिळणे गरजेचे आहे.

या स्थितीत हेल्थकेअर टेलिबायोमेडिकल कंपनीचे टेलिमेडिसीन तंत्राद्वारे चालणारी टेलिईसीजी ही यंत्रणा हृदयविकारांच्या रुग्णांसाठी वरदान ठरली आहे.

हृदयविकारांच्या रुग्णांना प्राथमिक उपचार वेळेत घेणे अतिगरजेचे असते. मोठ्या शहरात तात्काळ उपाययोजना उपलब्ध आहेत पण छोट्या शहरात अथवा ग्रामीण ठिकाणी प्राथमिक उपचार करण्यासाठी मिळणाऱ्या सुविधांचे प्रमाण कमी आहे. अशा वेळी प्राथमिक निदान करणाऱ्या टेलिईसीजी यंत्रणेद्वारे ईसीजी काढणे आता शक्य झाले आहे. टेलिईसीजी या उपकरणात एक छातीच्या ठोक्याची लय साठवणारे यंत्र आहे. हे यंत्र अगदी सोप्या रीतीने हाताळता येते. त्याला जोडूनच हातावरील दोन वायर आहेत. या यंत्रावर छातीच्या ठोक्याची लय साठवल्यानंतर कंपनीच्या मुंबई स्थित केंद्रावर त्यांच्या ठरावीक क्रमांकावर लॅण्डलाइन अथवा मोबाईलने संपर्क साधता येतो. या वेळी हे यंत्र फोनच्या रिसिव्हरजवळ धरून त्याचा आवाज हेल्थकेअर केंद्राला ऐकवण्यात येतो. त्या आवाजानुसार तेथील संगणकीकृत यंत्रणा आपल्या छातीच्या ठोक्याप्रमाणे ईसीजी तयार करते. काही मिनिटांतच ईसीजी रिपोर्ट कळविला जातो किंवा फॅक्स अथवा इंटरनेटद्वारे रिपोर्ट पाठवता येतो.



**हेल्थ केअर टेलिबायोमेडिकल प्रा.लि.कंपनीचे कार्यकारी संचालक रचित मेहता शेजारी टेली व ईसीजी यंत्रणा.**

अशा तऱ्हेने हृदयविकारांच्या रुग्णांना तात्काळ ईसीजी व त्या आधारे पुढील उपचार घेता येतात. पहिल्या तासात योग्य उपचार झाले तर हृदयविकाराचा मोठा धोका टळू शकतो.

हेल्थकेअर टेलिबायोमेडिकल कंपनीचे कार्यकारी संचालक रचित मेहता यांनी 'लोकमत'शी बोलताना ही माहिती दिली.

या कंपनीत तज्ज्ञ डॉक्टर्स आणि कुशल कर्मचारी, २४ तास आणि ७ दिवस सतत रुग्णांसाठी कार्यरत असतात. या यंत्रणेचे वैशिष्ट्य म्हणजे, आपल्याला ही यंत्रणा कुठेही बसून अगदी घरबसल्याही वापरता येते. कारण ही यंत्रणा हाताळणे अगदी सोपे आहे. ही यंत्रणा मुंबई, ठाण्यामध्ये अनेक दवाखान्यांत उपलब्ध आहे तसेच मुंबईबाहेर श्रीवर्धन, हरेश्वर, देवगड, कोल्हापूर या ठिकाणीसुद्धा काही दवाखान्यांत उपलब्ध आहे. पूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात ईसीजी यंत्रणेची सुविधा उपलब्ध करण्याचा आणि प्रामुख्याने जिथे रुग्णांसाठी तातडीच्या आरोग्यसेवा वेळेवर उपलब्ध होत नाहीत अशा ग्रामीण विभागात जास्त लक्ष केंद्रित करण्याचा ठाम विश्वास व्यक्त करून या यंत्रणेचा हृदयविकाराच्या रुग्णांनी नक्कीच लाभ घ्यावा, असे आवाहन रचित मेहता यांनी केले आहे.